<u>नियमित दिवाणी दावा १३५/२०१७</u>

कृष्णात बाबु दरेकर
विरुध्द
अशोक बापु दरेकर

**निशाणी ३३ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र.८ हे मयत झालेने त्यांची मुदतीमध्ये पुर्तता न केलेने त्यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेबाबत व प्रतिवादी क्र. ८ याचे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द खरेदीपत्र रद्द होवून मिळणेसाठी व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.८ गोविंदा दत्तू दरेकर हे दि.२८.०१.२०२४ इ. रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.८ हे मयत झालेनंतर त्यांचे वारस या दाव्याच्या कामी नोंद करणेत आलेले नाहीत. त्यामुळे दावा अबेट झाल्याबाबतचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र. ८ हे मयत झाल्यानंतर कागदपत्रे व वारसांबाबत माहिती देखील वेळेत मिळू शकली नाही. त्यानंतर न्यायालयास मे महिन्यामध्ये उन्हाळी सुट्टी असलेने देखील वादी यांना मुदतीत वारस रेकॉर्डवरती आणणेकरिता १ महिना १६ दिवसाचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता त्यांनी जाणीवपुर्वक व हेतुपुरस्कर विलंब केलेला नाही. त्यामुळे झालेला अबेटमेंट चा आदेश रद्द करण्यात यावा व विलंब माफ करण्यात यावा अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर अर्जात कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण नमुद नाही अर्जातील मजकूर पुर्णपणे चुकीचा आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा व अर्ज मंजूर केलेस वादीला ५००/- रुपये कॉस्ट व्हावी.

४. अर्जदार यांनी मयत प्रतिवादी क्र.८ गोविंदा दत्तू दरेकर यांचा मृत्यू दाखला निशाणी क्र. ३५ वर दाखल केला.

५. प्रस्तुत अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. सदरचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र.८ गोविंदा दत्तू दरेकर हे दि.२८.०१.२०२४ इ. रोजी मयत झालेने त्यांचे वारस या दाव्याकामी अभिलेखावर मुदतीमध्ये सामाविष्ट करण्यात न आलेने प्रतिवादी क्र.८ यांचे विरुध्द दावा अबेट करण्यात आला असा आदेश पारीत करणेत आलेला आहे. वादींनी जाणीवपुर्वक व हेतुपुरस्सर विलंब केलेला नाही. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द होवून झालेला विलंब माफ करणेत यावा या करिता हा अर्ज दाखल केलेला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.८ गोविंदा दत्तू दरेकर हे दि.२८.०१.२०२४ इ. रोजी मयत झाले संदर्भात त्यांचा मृत्यू दाखला हा या अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.८ गोविंदा दत्तू दरेकर हे मयत झालेचे दिसून येते. त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर निकाल लागणेकरिता मयत प्रतिवादी क्र.८ यांच्या वारसांना दावे कामी सामाविष्ट करणे हे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाचे तत्वानूसार प्रतिवादी क्र.८ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे व मयत प्रतिवादी क्र.८ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता झालेला विलंब माफ होणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार केला असता, दाव्याचा गुणदोषावर निकाल लागणेकरिता सदरचा अर्ज हा काही अंशी कॉस्टवर मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील सर्व कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. १ च्या वारसांना रक्कम रुपये ४००/- इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.01.27 11:22:02 +0530

दिनांक २२.०१.२०२६.
ठिकाण - पन्हाळा.

एस.व्ही.जंगमस्वामी,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पन्हाळा.